## प्रतिनियुक्तीने पद भरण्यासाठी मागणीपत्र.

१५.९.२०२१

क्र.जाहिरात ०७२१/आस्था/सीपीटीपी/२०२३/२०२१ दि.१२.०९.२०२१

वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, व्हीआयपी रोड,धरमपेठ, नागपूर ४४००१०.

E mail-vanamati.cptp@gmail.com Phone-०७१२ २५५५९९९, २५४१९४४

### एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत

वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, धरमपेठ, नागपूर या संस्थेमध्ये राज्य प्रशिक्षण धोरणानुसार एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत नवनियुक्त गट-ब अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग/कार्या-१२अ, मंत्रालय, मुंबई यांच्या दि.७.१.२०२० मध्ये नमुद केलेली पदे भरण्याची कार्यपध्दती व प्रतिनियुक्तीने भरण्यात येणाऱ्या पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विहित केल्या आहेत.

त्यास अनुसरुन शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई या विभागाच्या अधिपत्याखालील वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, धरमपेठ, नागपूर या कार्यालयातील **एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत** खालील नमूद केलेली पदे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे मधून प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अशा संवर्गात इच्छूक किंवा पात्र उमेदवार न मिळून आल्यास निम्न संवर्गात व श्रेणीमध्ये समकक्ष पदावरील पदोन्नतीसाठी विहीत केलेली अर्हता व अनुभव पूर्ण करणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचाही या पदावर प्रतिनियुक्तीसाठी विचार केला जाईल.

| अ.क्र. | पदनाम | गट | वेतनश्रेणी | रिक्त पदे | पदे भरण्याची कार्यपध्दती व कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | संचालक तथा सहायक प्राध्यापक (अर्थशास्त्र) | अ | (एस-२५ ७८८००-२०९२००) | ०१ | शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग/कार्या-१२अ, मंत्रालय, मुंबई यांच्या दि.७.१.२०२० मध्ये नमुद केलेली पदे भरण्याची कार्यपध्दती व प्रतिनियुक्तीने भरण्यात येणाऱ्या पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विहित केल्या आहेत. त्याचे अवलोकन व्हावे. |
| २ | सहाय्यक प्राध्यापक (कायदा) | अ | (एस-२३ ६७७००-२०८७००) | ०१ | |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक (लोकप्रशासन) | अ | (एस-२३ ६७७००-२०८७००) | ०१ | |
| ४ | प्रकल्प अधिकारी | ब | (एस-१५ ४१८००-१३२३००) | ०१ | |
| ५ | प्रकल्प सहायक (अराजपत्रित) | ब | (एस-१४ ३८६००-१२२८००) | ०१ | |
| ६ | लिपिक टंकलेखक | क | (एस-६ १९९००-६३२००) | ०२ | |
| | एकुण पदे | | | ०७ | |

२. प्रतिनियुक्तीने नियुक्ती प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी राहील, तदनंतर आवश्यकता विचारात घेऊन संबंधीत अधिकारी यांची इच्छुकता व प्रतिनियुक्तीने सेवा देणा-या संवर्ग नियंत्रण प्राधिका-याच्या सम्मतीने हा कालावधी जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत वाढविता येईल.

३. सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

४. सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहीत नमून्यात टंकलिखित करुन त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत निम्न स्वाक्षरीतांकडे दिनांक १८.१०.२०२१ पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावे.

५. प्रतिनियुक्तीने नियुक्ती घेऊ इच्छिणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी ते सद्या शासन सेवेत असल्याबाबतचे त्यांच्या कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (कार्या-१२),दि.१७.१२.२०१६ व समक्रमांक दि.१६.२.२०१८ व साप्रवि/(कार्या-१२अ), दि.११.५.२०१५ मधील निर्धारित तरतुदी, अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याबाबत अर्जाची तपासणी करण्यात येईल.

७. प्रशासकीय विभागानी / संवर्ग नियंत्रक विभागानी परिपूर्ण स्वरुपातील अर्ज त्यांचे आवश्यक प्रमाणपत्रांसह व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या मागील ५ वर्षाचे गोपनिय अहवालाच्या सत्यप्रतीसह या विभागाकडे कोणत्याही परिस्थीतीत दि.१८.१०.२०२१ पर्यंत पाठवावेत. विहीत मूदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास अशा अधिकारी/कर्मचारी यांचा विचार केला जाणार नाही.

८. अंतिम दिनांकास प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर पात्र अर्जाबाबत प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील.

-सही -

**महासंचालक**

वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था

धरमपेठ, नागपूर ४४० ०१०.

# परिशिष्ट-ड

## प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्जदारांनी करावयाच्या अर्जाचा नमुना

१. नाव (संपूर्ण नाव) :- ____________________

२. ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पद व कार्यालयाचे नाव :- ____________________

३. अ) सध्या धारण केलेले पद व पदस्थापनेचे ठिकाण :- ____________________

ब) वेतनश्रेणी :- ____________________

४. सध्या कार्यरत असलेल्या पदाचा संवर्ग नियंत्रक विभाग :- ____________________

५. जन्मदिनांक :- ____________________

६. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास असलेले वय (वर्षे व महिने) :- ____________________

७. शैक्षणिक अर्हता :- ____________________

८. मागासवर्गीय प्रवर्गात येत असल्यास प्रवर्ग :- ____________________

९. सध्या धारण केलेले पद नियमित आहे किंवा तात्पुरते आहे, नियमित असल्यास नियमित दिनांक :- ____________________

१०. अधिकारी/कर्मचा-यांनी घोषित केलेला स्वग्राम तालुका व जिल्हा :- ____________________

११. शैक्षणिक अर्हता व अनुभव :-

| | |
|---|---|
| शैक्षणिक अर्हता | १.<br>२.<br>३. |
| अनुभव | १.<br>२.<br>३. |

१२.आतापर्यंत केलेल्या सेवेचा तपशिल :-

(जागा कमी असल्यास स्वतंत्र विवरणपत्र

जोडावे व त्यावर स्वतःची स्वाक्षरी करावी)

| कार्यालय/विभाग | पद (संवर्ग अथवा प्रतिनियुक्तीवर ) | कालावधी | | वेतनश्रेणी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१३. संपर्क तपशिल :-

अ) पत्ता :- ____________________

____________________

____________________

दुरध्वनी क्रमांक :- ____________________

ई-मेल ____________________

ब) कार्यालयीन पत्ता :- ____________________

____________________

____________________

दुरध्वनी क्रमांक :- ____________________

ई-मेल ____________________

मी श्री/श्रीमती ____________________ असे प्रमाणित करतो/करते की, मी

प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदाच्या मागणीपत्रातील तपशिल वाचले असून पदासाठी विहित केलेल्या अर्हता मी धारण करित असल्याने सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्ज सादर करित आहे. अर्जात नमुद केलेली माहिती खरी असून खोटी आढळून आल्यास माझा अर्ज नाकारला जावू शकतो याची मला जाणीव आहे.

सही

(नाव)

पदनाम ____________________